# बास्केटबॉल स्पर्धेत कमला कॉलेज प्रथम



वारणानगर येथे शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना वारणा बँकेचे अध्यक्ष निपुण कोरे. छायाचित्रात उजवीकडून बी. टी. पाटील, के. जी. जाधव, व्ही. एस. चव्हाण, ए. बी. दिगे, एस. एन. खाडे, नागरगोंडे व इतर.

वारणानगर, दि. ११ (वार्ताहर)- येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात कमला कॉलेज कोल्हापूर व मुलांच्या गटात यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. तृप्ती जाधव, उदय जाधव, सायस्ता पाटील, दीपक ढेंबरे हे सामन्यातील उत्कृष्ट खेळाडू ठरले.

वारणानगर (ता. पन्हाळा) येथे दि. ७ व ८ ऑक्टोबर ९६ रोजी शिवाजी विद्यापीठातील विभागीय बास्केट बॉल संघटनेच्यावतीने व कर्मवीर हिरे महाविद्यालय आयोजित यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाच्या संयोजनाने या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील बारा महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने तर पाच महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने सहभाग घेतला होता. वारणा सहकारी बँकेचे चेअरमन निपुण कोरे यांच्याहस्ते सहकार महर्षि कै. तात्यासाहेब कोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच दीपप्रज्वलन व श्रीफळ वाढवून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यास वारणा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व्ही. एस. चव्हाण सचिव बी. टी. पाटील वारणा कॉलेजचे प्राचार्य ए. बी. दिगे, विद्यापीठाचे (खेळ) विभागीय सचिव नागरगोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेल्या संघाचा निकाल खालीलप्रमाणे - (मुलांच्या संघात) के.आय. टी. कॉलेज कोल्हापूर वि. डी. वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर (२१ ।९) ए.एस. सी. कॉलेज इचलकरंजी वि. डी. के. टी.कॉलेज इचलकरंजी (२०x५) महावीर कॉलेज कोल्हापूर वि. डी. डी. शिंदे सरकार कोल्हापूर (३५x१३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज पेठवडगाव विरुद्ध दूधसाखर महाविद्यालय बिद्री (विजयी), डी. के. टी. कॉलेज इचलकरंजी वि. स. ब. खाडे कॉलेज कोपार्डे (३०x१९) दूध साखर महाविद्यालय बिद्री वि. महावीर कॉलेज, कोल्हापूर (१९x३४) यशवंतराव चव्हाण वारणा कॉलेज वि.डी. के.टी. कॉलेज इचलकरंजी (४०x२०) असा असून अंतिम सामना महावीर कॉलेज कोल्हापूर वि. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर यांच्यात चुरशीचा झाला. विश्रांतीपर्यंत वारणा कॉलेजने आठ गुणांची आघाडी घेतली तर शेवटी १४ गुणांची आघाडी घेतली. (२२x५६) असा या सामन्याचा निकाल आहे. मुलींच्या संघात डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज पेठवडगाव वि. दि. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर (०x१७) यशवंतराव चव्हाण वारणा कॉलेज वि. कमला कॉलेज कोल्हापूर (६x१३) ए. एस. सी. कॉलेज इचलकरंजी वि. डी. डी. शिंदे, सरकार कोल्हापूर (०x१३) डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर वि. कमला कॉलेज कोल्हापूर यांच्यात अंतिम सामना होऊन कमला कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. मुलांच्या संघात महावीर कॉलेज तर मुलींच्या संघात डी. डी. शिंदे सरकार कॉलेजच्या संघाना द्वितीय क्रमांक मिळाला विजेत्या संघाचा वारणा साखर कारखान्याचे सेक्रेटरी बी. टी. पाटील यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

या स्पर्धांचे संयोजन वारणा महाविद्यालयाने केले तर व्यवस्थापक म्हणून विद्यापीठाचे (खेळ) विभागीय सचिव नागरगोंडे, वारणेचे बास्केट बॉलचे प्रशिक्षक प्रा. एस. एन. खाडे यांनी काम पाहिले, विद्यापीठाने नियुक्त केलेल्या दहा पंचांनी स्पर्धा हाताळल्या. प्रा. के. जी. जाधव, प्रा. आण्णासाहेब पाटील, सुभाष जाधव यांनी स्पर्धेचे सूत्रसंचालन केले. सोलापूर येथे होणाऱ्या पाच जिल्ह्याच्या विभागीय स्पर्धेसाठी यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाच्या संघाची निवड झाली आहे.

दै. सकाळ
१२ ऑक्टोबर ९६

## विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत कमला महाविद्यालय अजिंक्य

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठांतर्गत झालेल्या विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत कमला महाविद्यालयाने सलग नवव्या वर्षी विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी डी. डी. शिंदे महाविद्यालयाचा १०-१ अशा गुणांनी पराभव केला. वारणानगर (ता. पन्हाळा) येथे ही स्पर्धा झाली.

या संघाची सोलापूर येथे १८ व १९